पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १०१**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०५/०२/२०१९** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार**, दिनांक **०५/०२/२०१९** रोजी दुपारी **०२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड – सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
९. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१०. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
११. मा.बारणे अर्चना तानाजी

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – मा.आयुक्त, मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा अधिकारी, मा.तुपे, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.पंडित – अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.देशमुख, मा.सेठीया, मा.फुटाणे, मा.वाघुंडे, मा.राणे, मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.आढारी, मा.लटपटे, मा.गाडेकर – प्रशासन

अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३२) शिक्षण विभागातील आणि प्राथमिक शाळांतील संगणक यंत्रणा देखभाल दुरूस्तीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.३३) विद्युत विषयक कामांचे PMC करिता सल्लागार संस्थेची नामिकासूची विहित करणेबाबत.

विषय क्र.३४) सन २०१९-२०२० या सरकारी वर्षाकरिता कराचे व करइतर बाबींचे दर निश्चितीबाबत.

विषय क्र.३५) बोपखेल येथील मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसीत करणेबाबत.

विषय क्र.३६) ब मुख्यालयाअंतर्गत सन २०१६-१७ साठी जलक्षेत्र क्र.बी/२ ते बी/८ मध्ये व्हॉल ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणे या कामास नविन किमान वेतन दरानुसार फरक मिळणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३७) ब मुख्यालयाअंतर्गत सन २०१६-१७ साठी थेरगाव गुरूत्वनलिका अंतर्गत येणा-या भागात व्हॉल ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणे या कामास नविन किमान वेतन दरानुसार फरक मिळणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३८) सन २०१७-१८ साठी थेरगाव गुरूत्वनलिका वरील जलक्षेत्र क्र.४ ते ८ पाण्याच्या टाकी वरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणे या कामास नविन किमान वेतन दरानुसार फरक मिळणेबाबत व वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे मागणीनुसार महापालिका कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) महापालिकेच्या मोकळ्या जागा विनापरवाना वापरणा-यांकडून भाडे तसेच दंड व्याजासहित वसूल करणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) महापालिका परिसरातील झाडांना सिमेंट व पेव्हींग ब्लॉकने केलेले आळे काढुन टाकणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२१२ दि.२२/१/२०१९ रद्द करणेबाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

----------

दि.२९/०१/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १००)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -४२८९ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०५/०२/२०१९

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव -

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.५३ दि.१२/१०/२०१८

विषय क्र.१ चा विचार दि.१२/०३/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९० विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१४११/२०१८ दि.११/१२/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे पदव्युत्तर शिक्षण संस्थेकरिता नियतकालिके पुरविणेकामी ई.नि.सु.क्र.23/2018-19 अन्वये लघुत्तम निविदाकार 01) M/s Prime Mag Subscription PVT. LTD यांचे एकुण 22 प्रकारचे नियतकालिके पुरविणेकामी र.रु.20,05,139.84 02) M/s.Total IT Solution PVT. LTD यांचे एकुण 38 प्रकारचे नियतकालिके पुरविणेकामी र.रु.2,30,580.08 दर करारानुसार एक वर्ष कालावधीकरिता एकुण 60 प्रकारचे नियतकालिके पुरविणेकामी पुर्णांकांत एकुण र.रु.22,35,720/- (अक्षरी र.रु. बावीस लाख पस्तीस हजार सातशे वीस फक्त) इतके लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर हे अंदाजपत्रकीय र.रू.२५,७२,७८५/- पेक्षा १३.१०% कमी असलेने र.रू.२२,३५,७२०/- चे मर्यादेत पदव्युत्तर शिक्षण संस्था वायसीएमएच यांच्या मागणी प्रमाणे नियतकालिके पुरविणेकामी खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९१ विषय क्रमांक – ०३
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.YCMH/भांडार/२/कावि/१३/२०१९ दि.०७/०१/२०१९

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा रुग्णालयातील विविध वॉर्डातील/विभागातील उपकरणांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टसची मागणी बायोमेडीकल इंजिनियर यांनी केलेली आहे. त्यानुसार आवश्यक स्पेअर पार्टसचा दिलेल्या मेकनुसार पुरवठा करणेसाठी ई-निविदा सुचना क्र.०१/२०१८-१९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदांमध्ये मे.प्राईम सर्जिकल & फार्मा, चिंचवड यांचे २६ बाबींसाठी एकूण र.रु.४,३१,६८०/-, मे.श्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांचे १६ बाबींसाठी एकूण र.रु.४,०८,९१२/-, मे.प्रियंका एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे १० बाबींसाठी एकूण र.रु.१,८८,८४५/-, मे.आद्या इन्फ्रा, नवीमुंबई यांचे १८ बाबींसाठी एकूण र.रु.५,१७,२१५/- व मे.ट्रिनीटी एंटरप्रायजेस, पिंपरी यांचे ५ बाबींकरिता एकूण र.रु.२,२९,९७५/- लघुत्तम दरप्राप्त झाले असुन संबंधित दर स्विकृत करण्यात आलेले असुन संबंधित पुरवठाधारकांना करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर स्पेअर पार्टस खरेदीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.१७,७६,६२७/- (अक्षरी र.रू.सतरा लाख शहात्तर हजार सहाशे सत्तावीस फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९२ विषय क्रमांक – ०४
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग– मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकिय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/५७/२०१९ दि.१७/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

$H_1N_1$ या आजाराबाबत लक्षणे व घ्यावयाची दक्षता विषयक जनजागृती करणेकामी ६० सेकंदाची जनजागृतीची क्लिप दिवसातून १० वेळा या प्रमाणे प्रती दिन १५ दिवसांकरीता एकूण ९००० सेकंदांसाठी प्रसिध्द करणेसाठी र.रु.४,०५,०००/- + १८% GST (७२,९००) असे एकूण र.रु.४,७७,९००/-(अक्षरी र.रू.चार लाख सत्याहत्तर हजार नऊशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९३ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/३३/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV2/1-2018-19 अन्वये मोशी कचरा डेपो येथे स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.ए.एफ.मंजाळकर यांचेकडून नि.र.रु.८३,५८,७३२/- पेक्षा -०२.१०% कमी या सुधारित दराने निविदा प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा -१२.३८% ने कमी येत असल्याने प्राप्त सुधारित दराने र.रु.८१,८३,१९९/- (अक्षरी र.रू.एक्याऐंशी लाख त्र्याऐंशी हजार एकशे नव्याण्णव फक्त) पर्यंत काम करून घेणेस व नियमानुसार निविदेतील अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९४ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१३९/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.२८४ दि.१२/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती दि.२९/१०/२०१८ रोजी घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/५५८/२०१८ दि.२९/११/२०१८ देण्यात आलेला आहेत. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त पदे व नियुक्ती आदेश निर्गत करूनही विहित मुदतीत रूजू न झालेल्या रिक्त जागेकरीता दि.१४/०१/२०१९ रोजी Walk In Interview घेण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये खालील प्राप्त उमेदवाराची नियुक्ती करणेत आलेली आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | प्रवर्ग/निवड | मानधन प्र.महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. योगिता मोतीराम वळवी | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | अनु. जमाती | ४५०००/- |
| २ | डॉ. प्रकाश वसंतराव भातकुलकर | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | ओ.बी.सी | ४५०००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दिनांक २८/०१/२०१९ ते दि.२८/०५/२०१९ अखेर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९५ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/३५/२०१९ दि.३०/०१/२०१९

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV3/2-2018-19 अन्वये कासारवाडी ४० द.ल.लि मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा-३ चे चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स यांचेकडून नि.र.रु.२,६३,५५,४५६/- पेक्षा -१३.५०% कमी या दराने र.रु.२,२७,९७,४६९/- (अक्षरी र.रू. दोन कोटी सत्तावीस लाख सत्याण्णव हजार चारशे एकोणसत्तर फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदेतील अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९६ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/६८/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालयासाठी दर करार पध्दतीने महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित मुंबई (महाटेक्स) यांचेकडून लिनन साहित्य (बेडशिट, चादर व ब्लॅकेट) दर कराराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५२,२५,४५०/- (अक्षरी र.रु.बावण्ण लाख पंचवीस हजार चारशे पन्नास फक्त) चे खर्चास व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत, मुंबई ७५ यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९७ विषय क्रमांक – ०९
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बीपी/१/कावि/१२१/२०१९ दि.३१/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभागाचे सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील ग्रीन बिल्डींग इमारत प्रशमन शुल्क परतावा या लेखाशिर्षावरील उपलब्ध शिल्लक र.रू.१,७०,००,०००/- मधून र.रु.५,००,०००/- वाहन इंधन व र.रु.५,००,०००/- अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ अन्वये वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९८ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२३६/२०१९ दि.३०/०१/२०१९

विषय - कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.९ खराळवाडी मधील कामगार नगर, अक्षय-विहार सोसायटी, सोनकर सोसायटी, भक्ती सोसायटी परिसर व उर्वरित भागात मलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४२९९ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – नागरी सुविधा केंद्र
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नासुके/२/कावि/७५५/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

तिस-या टप्प्यामध्ये खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र चालक नियुक्त करणेकामी मंजुर यादी मध्ये श्री.भाऊसाहेब थोरात (प्रभाग क्र.१२) यांचा समावेश करून नागरी सुविधा केंद्रचालक म्हणून नियुक्ती करणेकामी महापालिका कार्यक्षेत्राच्या प्रभाग क्र.१२ मध्ये श्री.भाऊसाहेब

थोरात यांचा समावेश करून नागरी सुविधा केंद्रचालक म्हणून नियुक्त करण्याकरिता महानगरपालिका RFP मधील अटी/शर्तीनुसार प्रती सेवा र.रु.२०/- नागरिकांकडून स्विकारण्यात येऊन त्यापैकी र.रु.५/- महापालिकेस प्राप्त होणार आहे. तसेच, मिळकत कर, पाणीपट्टी इ. बिलासाठी स्विकृत होणारे भरणा प्रती पावती र.रु.५/- या प्रमाणे महापालिकेमार्फत अदा करणेस प्रथम तीन वर्ष कालावधीसाठी करारनामा करुन श्री.भाऊसाहेब थोरात (प्र.क्र.१२) यांना खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्रचालक नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०० विषय क्रमांक – १२
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/६९/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कातारी (Turner) या व्यवसायाचे नुतनीकरण व अद्ययावतीकरण करण्यासाठी आवश्यक टुल्स किट, इक्विपमेंट व मशिनरी इ. आवश्यक साहित्य खरेदीसाठी ई निविदा सुचना क्र.३६/२०१८-१९ नुसार मे.इंद्रनिल टेक्नॉलॉजिज, नवी सांगवी, पुणे २७ यांचे र.रु.४,२७,७७,७७७/- (अक्षरी र.रु.चार कोटी सत्तावीस लाख सत्त्याहत्तर हजार सातशे सत्त्याहत्तर फक्त) हे अंदाजपत्रकिय दर र.रू.४,३९,५२,०००/- पेक्षा -२.६७% लघुत्तम दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले असलेने त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस व सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०१ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/७०/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सांधाता (Welder) या व्यवसायाचे नुतनीकरण व अद्ययावतीकरण करण्यासाठी आवश्यक टुल्स किट, इक्विपमेंट व मशिनरी इ. आवश्यक साहित्य खरेदीसाठी ई निविदा सुचना क्र.३७/२०१८-१९ नुसार मे.मोगोरा

कॉस्मिक प्रा.लि.भोसरी, पुणे २६ यांचे र.रु.२,७९,००,०००/-(अक्षरी र.रु.दोन कोटी एकोणऐंशी लाख फक्त) हे अंदाजपत्रकिय दर र.रू.२,९१,००,०००/- पेक्षा -४.१२% लघुत्तम दर प्राप्त झालेले असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले असलेने त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस व सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०२ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/१४८/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वर ऑनलाईन Bid Number GEM/2018/B/GEM/2018/B/130933 अन्वये दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन बिडरकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले असून त्यापैकी पात्र दोन बिडरधारकांचे दरपत्रक उघडणेत आलेले आहे. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा. लि पुणे-०४ यांचे संगणक संच (Lenovo मेक) बाब क्र.१ एकूण-७९ नग साहित्यासाठी र.रु.३८,२७,१५५/-, प्रिंटर (कॅनन मेक) बाब क्र.२ एकूण-६८ नग साहित्यासाठी र.रु.१५,९०,६५६/- व युपीएस (इमरसन मेक) बाब क्र.३ एकूण-५९ साहित्यासाठी र.रु.२,८३,२००/- असे एकत्रीत एकूण र.रु.५७,०१,०११/-(अक्षरी र.रू.सत्तावन्न लाख एक हजार अकरा फक्त) लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ०.९२% ने कमी असलेने त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०३ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/उद्यान/२५/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.57/08/2018-19 अन्वये पिंपरी प्रभाग क्र.२७ मधील धर्मवीर संभाजी उद्यान येथे विविध स्थापत्य विषयक कामे करणेकामी

मे.सोहम एंटरप्रायजेस नि.र.रू.91,88,703/- (अक्षरी र.रू.एक्क्याण्णव लाख अठ्ठ्याऐंशी हजार सातशे तीन फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.87,87,213/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.87,87,213/- पेक्षा 32.1% कमी म्हणजेच र.रु.59,66,518/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,53,279/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,48,210/- = एकुण र.रु.63,68,007/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ लाख अडूसष्ठ हजार सात फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०४ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/उद्यान/२६/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.57/09/2018-19 अन्वये प्रभाग क्र.32 मधील स्व.तानाजीराव शितोळे सरकार उद्यान व इतर उद्यानाची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.59,99,799/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख नव्व्यान्नव हजार सातशे नव्व्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.59,28,748/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.59,28,748/- पेक्षा 24.5% कमी म्हणजेच र.रु.44,76,205/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.37,851/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.33,200/- = एकुण र.रु.45,47,256/- (अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख सत्तेचाळीस हजार दोनशे छपन्न फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०५ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/४०३/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.११/४/२०१८-१९ अन्वये जलशुध्दिकरण केंद्र से.क्र.२३ येथील टप्पा क्र.४ च्या फिल्टर बेडची वाळू बदलणे, सुरक्षा आवरण करणे व तद्नुषंगिक कामे करणेकामी मे. शिवम एंटरप्रायझेस निविदा र.रू.१,५८,२३,४६६/- (अक्षरी र.रू.एक कोटी अठ्ठावन्न लाख तेवीस हजार चारशे सहासष्ट फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.१,५७,५५,१४९/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.१,५७,५५,१४९/- पेक्षा १३.०१% कमी म्हणजेच र.रु.१,३७,०५,४०४/- + रॉयल्टीची र.रु.६८,३१७/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम रु.०/- = एकूण र.रु.१,३७,७३,७२१/- (अक्षरी र.रू.एक कोटी सदोतीस लाख त्र्याहत्तर हजार सातशे एकवीस फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०६ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/८१/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.66/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.3 च-होली, चोविसावाडी, वडमुखवाडी, काळजेवाडी बुर्डेवस्ती, पठारेमळा शाळेची सुधारणा करणेकामी मे. श्रीकृपा एंटरप्रायजेस नि.र.रू.29,95,525/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख पंच्याण्णव हजार पाचशे पंचवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,53,918/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,53,918/- पेक्षा 13.10% कमी म्हणजेच र.रु.25,66,955/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.707/- मटेरियल टेस्टींग चार्जेस

र.रु.40,900/- = एकुण र.रु.26,08,562/- (अक्षरी र.रू. सव्वीस लाख आठ हजार पाचशे बासष्ठ फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/८२/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.52-4-2018-19 अन्वये प्रभाग क्र.३ च-होली येथील आरक्षण क्र.२/८१ खेळाचे मैदान विकसित करणेकामी (टप्पा-२) मे.पी.एन.नागणे नि.र.रू.5,40,64,407/- (अक्षरी र.रु.पाच कोटी चाळीस लाख चौसष्ठ हजार चारशे सात फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.5,25,66,847/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.5,25,66,847/- पेक्षा 6.30% जास्त दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन २०१८-१९ चे एस एस आर दरानुसार प्राप्त निविदा निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 5.31% ने कमी येत असल्याने, प्राप्त निविदा मंजुर दराने म्हणजेच र.रु.5,58,78,558/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.14,58,510/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.39,050/- = एकुण र.रु.5,73,76,118/- (अक्षरी र.रू.पाच कोटी त्र्याहत्तर लाख शहात्तर हजार एकशे अठरा फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०८ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – आरोग्य मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/८७/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचरा डेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी ब, क व इ प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी व अ, फ व ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कचरा उचलणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेचे (सेकंडरी कलेक्शन) व अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.१४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व प्रभाग क्र.१८ व १९ मध्ये २ कॉम्पॅक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) या कामासाठी मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. या संस्थेस देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी दरवाढ मिळणेकामी केलेल्या विनंतीनुसार मा.आयुक्तसो यांचे दि.१/०२/२०१९ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये अ, फ, ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कचरा वाहतूक करणे (सेकंडरी वाहतूक) याकामासाठी सन २०१५ पासून प्रत्येक वर्षीच्या दरावर ५% दरवाढ गृहीत धरुन दि.०१/०१/२०१९ पासून कॉम्पॅक्टर या वाहनाकरिता प्रति मे.टन र.रु.७३७.४६ व ट्रक या वाहनाकरिता प्रति मे.टन र.रु.८८५.२३ याप्रमाणे दर देणेकामी मान्यता दिलेली आहे. घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेबाबतच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून सदर काम पुर्ण होणेसाठी मा.उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेशामुळे काही कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीत आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि., यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत उपरोक्त नमूद दर वाढीसह मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,९३,७९,९६४/- (अक्षरी र.रु.तीन कोटी ऱ्यान्नव लाख एकोणऐंशी हजार नऊशे चौसष्ठ फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३०९ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/८५/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.70-02-2018-19 अन्वये प्र.क्र.२६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंक सिटी कॉर्नर पर्यंत डी.पी. रस्ता सिमेंट काँक्रीटचा करणेकामी मे.निखील कन्स्ट्रक्शन नि.र.रू.24,48,43,847/- (अक्षरी र.रु.चोवीस कोटी अठ्ठेचाळीस लाख त्रेचाळीस हजार आठशे सत्तेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.24,03,60,632/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.24,03,60,632/- पेक्षा 1% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 14.11% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.23,79,57,026/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.44,43,506/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.39,710/- = एकुण र.रु.24,24,40,242/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१० विषय क्रमांक – २२
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/८६/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.70-01-2018-19 अन्वये नविन प्रभाग क्र.२७ रहाटणी मधील श्रीनगर, गजानननगर, रायगड कॉलनी येथील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.मंजुळाई कन्स्ट्रक्शन कं. नि.र.रू.11,69,31,823/- (अक्षरी र.रु.अकरा कोटी एकोणसत्तर लाख एकतीस हजार आठशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.11,65,43,580/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.11,65,43,580/- पेक्षा 11% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-

19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 16.84% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.10,37,23,786/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.78,722/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.3,09,520/- = एकुण र.रु.10,41,12,028/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३११ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/८७/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.70-09-2018-19 अन्वये प्र.क्र.२६ येथील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौकापर्यंतचा सिमेंट कॉँक्रीटचा रस्ता करणेकामी मे.मंजुळाई कन्स्ट्रक्शन कं. नि.र.रू.9,59,37,969/- (अक्षरी र.रु.नऊ कोटी एकोणसाठ लाख सदतीस हजार नऊशे एकोणसत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.9,56,42,163/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.9,56,42,163/- पेक्षा 10% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 15.83% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.8,60,77,947/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.15,283/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,80,524/- = एकुण र.रु.8,63,73,754/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१२ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/८३/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67-06-2018-19 अन्वये प्रभाग क्र.२७ येथील कुणाल हॉटेल ते नखाते वस्ती या १२ मी. रुंद रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकामी मे.आर ई इन्फ्रा प्रा. लि. नि.र.रू.4,77,69,764/- (अक्षरी र.रु.चार कोटी सत्याहत्तर लाख एकोणसत्तर हजार सातशे चौसष्ट फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,75,15,745/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,75,15,745/- पेक्षा 9.85% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 15.75% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.4,28,35,444/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.37,119/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,16,900/- = एकुण र.रु.4,30,89,463/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१३ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/८४/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.64-15-2018-19 अन्वये प्रभाग क्र.२५ पुनावळे येथील आवश्यकतेनुसार रस्ते विकसीत करणेकामी मे.लोणावळा कन्स्ट्रक्शन कंपनी नि.र.रू.4,16,84,210/- (अक्षरी र.रु.चार कोटी सोळा लाख चौ-याऐंशी हजार दोनशे दहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,15,49,935/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,15,49,935/- पेक्षा 9.9% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत

योग्य दरापेक्षा 25.30% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.3,74,36,491/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.64,875/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.69,400/- = एकुण र.रु.3,75,70,766/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१४ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७६/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.64/6/2018-19 अन्वये से.क्र.16 राजे शिवाजीनगर मध्ये विविध विकासकामे करणेकामी मे. श्रीगणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.3,33,00,047/- (अक्षरी र.रु.तीन कोटी तेहत्तीस लाख सत्तेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,18,84,987/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,18,84,987/- पेक्षा 14.70% कमी म्हणजेच र.रु.2,71,97,894/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,92,810/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.8,22,250/- = एकुण र.रु.2,86,12,954/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१५ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/१५/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.47/8/2018-19 अन्वये प्र.क्र.१६ हद्दीलगत देहूरोड कॉन्टोनमेंट बोर्ड हद्दीतील शितलानगर येथील स्मशानभुमी मध्ये विद्युत/डिझेल/गॅस दाहिनी बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवकुमार कन्स्ट्रक्शन नि.र.रू.1,66,38,531/- (अक्षरी र.रु.एक कोटी सहासष्ठ लाख अडोतीस हजार पाचशे एकतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,66,01,344/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,66,01,344/- पेक्षा 12.21% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन २०१८-१९ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 28.05% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.1,45,74,320/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,287/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.27,900/- = एकुण र.रु.1,46,11,507/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१६ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/८८/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा वैद्यकीय विभागाचे मागणीनुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयास आवश्यक पायरेथ्रम एक्स 2 टक्के आय एस आय मार्क खरेदीकरणेकामी ई नि.सु.क्र.33/2018-19 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांचे प्रती लिटर दर र.रु.2,273/- नुसार 1450 लिटरसाठी एकुण र.रु.32,95,850/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख पंच्याण्णव हजार आठशे पन्नास फक्त) प्राप्त झाले असुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.33,06,000/- पेक्षा 0.30 टक्केने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन

त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१७ विषय क्रमांक – २९
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/८९/२०१९ दि.०१/०२/२०१९

विषय - मनपाचे आरोग्य व उद्यान विभागास आवश्यक हँगींग लिटरबीन्स खरेदीबाबत.

विषय क्र.२९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/२५४/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.33/01/2018-19 अन्वये प्र.क्र.57 मधील दापोडी ब्रिज ते तुळजा भवानी मंदीर ते सृष्टी चौक पर्यतच्या 18 मीटर डी.पी. रस्त्याचे विकासांतर्गत विद्युत विषयक कामे करणेकामी मे.शांती इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.1,66,25,413/- (अक्षरी र.रू.एक कोटी सहासष्ट लाख पंचवीस हजार चारशे तेरा फक्त) पेक्षा 17.78% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३१९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/२५५/२०१९ दि.०१/०२/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.26/03/2018-19 अन्वये प्र.क्र.28 मधील कोकणे

चौक ते काळेवाडी फाटयापर्यत उच्चक्षमता द्रुतग्रती (HCMTR) रस्ता विकसीत करणे या कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणेकामी (प्रकाश व्यवस्था) मे.इलेक्ट्रो मॅकेनिक्स नि.र.रू.1,00,10,867/- (अक्षरी र.रू.एक कोटी दहा हजार आठशे सदुसष्ट फक्त) पेक्षा 17.17% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -४३२० विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – शिक्षण (प्राथमिक)
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.शिवि/१०/कावि/२५/२०१९ दि.२४/०१/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील व प्राथमिक शाळेतील संगणक यंत्रणा देखभाल दुरुस्तीकामी मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली. यांना शि.मं/९अ/४२/२०१८ दि. २०/०३/२०१८ अन्वये कामाचे आदेश दि.०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०१८ पर्यंत देण्यात आले होते. सदर कामकाजाची मुदत ३१/१२/२०१८ रोजी पूर्ण झालेली आहे. पुढील वर्षाकरिता निविदा प्रकिया कामकाज चालू आहे सदर प्रक्रीया पूर्ण होणेकामी अजून काही कालावधी लागणार आहे त्यामुळे मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली. यांना पुढील तिन महीन्यासाठी म्हणजेच दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेचे तसेच याकामी येणा-या र.रु.३,२२,८६७/- चे खर्चास किवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३२१ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – विद्युत
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मुका/कावि-४/७७/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या विद्युत विषयक प्रकल्प कामाकरीता

नामिका सुची करीता सल्लागार नियुक्ती कऱणे साठी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून निविदा मुदतीमध्ये एकूण १४ निविदा धारकांनी निविदा सादर केल्या आहेत. प्राप्त निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून व्याप्ती व श्रेणीनुसार (categories' A,B,C,D) पात्र तक्ता तयार केला आहे. पात्र झालेल्या सल्लागारांची नामिका सुची सोबत प्रपत्र अ,ब,क,ड मध्ये तयार करण्यात आली आहे. तसेच सदर सल्लागारांना अदा करावयाचा फि मसूदा प्रपत्र १ सोबत जोडला आहे. सदरची सल्लागारांची सूची अंतीम करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४३२२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०५/०२/२०१९ विभाग – करआकारणी व करसंकलन

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/९/कावि/१०८/२०१९ दि.२९/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये खालील नमूद केलेले दर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर सन २०१८-२०१९ करिता लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते. सन २०१९-२०२० या सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०१९ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०१९-२०२० या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी / शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव : सन २०१९-२०२० या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत

अ. करांचे दर

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
